**कार्यकारी अभियंता**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
सावंतवाडी

## माहिती अधिकार २००५

# नागरिकांची सनद

## वर्ष २०११

# १. प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत गौरवशाली परंपरा असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी अंतर्गत गेल्या ३४ वर्षापासून यशस्वीपणे कार्यरत असलेले व कोकणाचे नाते मुंबई या आर्थिक नगरीशी जोडून कोकणातील नागरिकांच्या विकासाला भव्य प्रवेशद्वार खुले करणारे **सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग** हे महत्वाचे कार्यालय आहे. सार्वजनिक बांधकाम विभागीय कार्यालय हे सावंतवाडी येथे कार्यरत असून कोकणातल्या नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधिलकी सार्वजनिक बांधकाम विभाग या सनदेद्वारे जाहिर करत असून ती स्विकारीत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभुतीपुर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन तसेच सर्वसामान्य नागरिकांचे सार्वजनिक बांधकाम विभागा विषयीचे हक्क त्यांच्या पर्यन्त प्रगतीच्या व विकासाच्या वाटेने अतिशय सुलभतेने पोहचविण्याचा हा ध्यास आहे.

सावंतवाडी (सा.बां.) विभागांतर्गत प्रामुख्याने श्री छत्रपती शिवप्रभुच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सिंधुदुर्ग जिल्हयाचा भौगोलिक विस्तार येतो.

सिंधुदुर्ग जिल्हयाचा विकास प्रगती व नागरिकांचे प्रश्न याचा सांगोपाग विचार करुनच ही सनद तयार करण्यात आली आहे.

१. आपल्या भारत देशाची धमनी समजले जाणारे व या विभागाच्या कार्यक्षेत्रात येणारे प्रमुख राज्य मार्ग व राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग अतिशय उत्तम दर्जाचे करणे.

२. रस्ते विकास योजनेतील मंडळाच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची नवीन बांधकामे, व प्रमुख जिल्हा मार्ग सुधारणा तसेच त्यावरील मोठे पूल, लहान पूल, मो-या यांची बांधकामे उत्तम दर्जाची व सुरक्षित अशी करणे.

३. विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत असलेल्या इमारती, रस्ते व पलांची नियतकालीक देखभाल व दुरुस्ती उपलब्ध होणा-या निधीतून प्रभावीपणे करणे व सेवा व सुविधांचा स्तर उंचावत नेणे.

४. विभागीय कार्यालयाशी संलग्न असलेल्या इतर सर्व शासकीय उप विभागाना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

५. विभागांतर्गत सर्व उप विभागांच्या अखत्यारीतील ठेकेदारांची नोंदणी प्रमाणपत्रे व विविध ना हरकतीच दाखले विहित कालावधीत निर्गमित करणे.

६. विभागीय कार्यालयांत व विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयांत प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

७. विभागाच्या कार्यक्षेत्रात जनहितार्थ उद्‌भवणा-या आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने स्थापत्य अभियांत्रिकाशी संबंधीत व अन्य जनहितार्थ आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

८. विभागीय कार्यालयांत व विभागाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयातून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

९. विभागीय कार्यालयांत विभाग कार्यालयाचे अखत्यारीतील प्रत्येक कार्यालयांत ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांची प्रभावीपणे निराकरण करणे.

१०. सार्वजनिक ठिकाणी जनतेच्या सुरक्षिततेच्या तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी वापरावयाचे मंडप, स्टेज इत्यादी बाबतीत सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी करुन प्रमाणित करणे.

११. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत विभागांतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करुन देणेबाबत सक्षम स्तरावर तत्पर कार्यवाही होणे.

१२. विभागीय कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून विभागाच्या कार्यालयाचे व सार्वजनिक बांधकाम उप विभागाचे लोकाभिमुखता वाढविणे.

१३. संगणकीकरणाबाबत विभागीय कार्यालय व सर्व उप विभागीय कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे. तसेच मंडळ कार्यालय व प्रादेशिक कार्यालय , मंत्रालय यांना नेटवर्कद्वारे आवश्यक तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशिल राहणे.

१४. विभागांतर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mhapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१५ विभागातर्गत येणा-या सर्व विषयाची अनुसुची तयार करणे व निपटारा करणेचा विहित कालावधी ठरविणे.

१६. विभागीय कार्यालय व अखत्यारीतील सर्व कार्यालयामध्ये राजीव गांधी अभियानांतर्गत सर्व अभिलेख अद्ययावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्ययावत करणे.

१७. विभागाच्या कामकाजात पारदर्शकता व सुसुत्रता आणणे व गतिशिल प्रशासकीय कामकाजाचा अवलंब करणे.

१८. नागरीकांच्या प्रश्नांची व विभागाशी संबंधित असलेल्या विषयाची माहिती व केलेली कार्यवाही नागरीकांपर्यन्त पोहोचविण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे.

१९. विभागीय कार्यक्षेत्रात येणारे ग्रामपंचायत स्तरापासून ते विधानसभेच्या , लोकसभेच्या प्रतिनिधीपर्यन्त त्यांना आवश्यक असलेली माहिती त्वरीत पुरविणे व जनसंपर्क ठेवणे.

२०. विभागांतर्गत व मंडळाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालयामध्ये अतिशय सौजन्यपूर्ण सेवाभावी व उत्साहीत वातावरण ठेवणे.

२१. दैनंदिन कामकाजात आधूनिकता, गतिमानता व गुणवत्ता आणणेसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे व सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रतिमा उज्वल करणे.

२२. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

**१. विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी.**

**१. विभागीय कार्यालयाची बांधिलकी -**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडताना सावंतवाडी , सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी , जिल्हा सिंधुदुर्ग

**अ)** सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

**ब)** सौजन्यपूर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

**क)** पारदर्शकता व निष्ठा ठेवील.

यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे/ प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

**२. नागरीकांची जबाबदारी -**

**१)** शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचेशी नागरीकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

**२)** नागरीकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

**३)** नागरीकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा आसावा.

**४)** विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

**५)** सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था राखण्यास सहकार्य करावे.

**६)** नागरीकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.

७) रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्षराजींचे जतन ही नागरीकांची सुध्दा जबाबदारी राहील.

८) नागरीकांनी कायदेशीर तरतुदी, नियम , अलिखित संकेत यांचे पालन करावे.

९) नागरीकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

**३. विभागीय कार्यालयाची रचना -**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक स्तरावरील मुख्य अभियंता हे सर्वोच्च तांत्रिक अधिकारी असून त्यांचे मुख्यालय मुंबई या ठिकाणी आहे. प्रादेशिक विभागाअंतर्गत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण मुख्य अभियंता स्तरावर होते. प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंत्यांचे अखत्यारीत जिल्हा स्तरावर सर्वसाधारणपणे अधीक्षक अभियंता दर्जाचे अधिकारी मंडळांतर्गत कामांची अंमलबजावणी व प्रशासनिक नियंत्रण यांची जबाबदारी सांभाळतात.

मुंबई सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत अधीक्षक अभियंता रत्नागिरी, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी अंतर्गत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी हे कार्यालय असून त्यांचे कार्यक्षेत्र सिंधुदुर्ग जिल्हयातील ०५ तालुक्यामध्ये आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचे अधिपत्याखाली एकूण ०५ उप विभागीय अभियंता कार्यरत असून त्यांचे प्रत्येकाचे कार्यक्षेत्र हे त्या त्या तालुक्यापुरते मर्यादीत आहे.

राज्य महामार्गाच्या बाबतीत कार्यक्षेत्राचा निकष रस्त्याच्या लांबीनुसार आहे. राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्र यांचेकडील कामांसाठी स्वतंत्र कार्यकारी अभियंता व उप अभियंता आहेत. कार्यकारी अभियंता यांचे कार्यक्षेत्राचा नकाशा, कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता सोबत जोडला आहे. (परिशिष्ट-अ)

विभागीय कार्यालयाकडे एकूण ०५ तालुक्यांचे कार्यक्षेत्र आहे. त्याप्रमाणे सावंतवाडी सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांचेकडे सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण, वेंगुर्ला, कुडाळ, दोडामार्ग, सावंतवाडी या तालुक्यांचा समावेश आहे. विभागांतर्गत कार्यक्षेत्राची विभागणी उप विभागीय अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम उप विभागामध्ये झालेली असून त्यांची मुख्यालये त्या त्या तालुक्यामध्ये आहेत. कार्यकारी अभियंता यांचे अधिकार क्षेत्रातील बांधकाम विभाग व उपविभाग हेच खऱ्या अर्थाने माहितीचे स्त्रोत आहेत. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरुवातीपासूनची या कार्यालयात मिळू शकते.

कार्यकारी अभियंता हे विभागांतर्गत प्रत्येक तांत्रिक बाबींसाठी जबाबदार असे अधिकारी आहेत.

प्रस्तावनेत नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा सार्वजनिक बांधकाम विभाग पुरवित असतो. विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां.नियमावली , लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून केले जाते.

**४. विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र -**

सावंतवाडी (सा.बां) विभाग, सावंतवाडी या कार्यालयाचे कार्यक्षेत्र सिंधुदुर्ग जिल्हयात असून ते जिल्हयातील एकुण ०५ तालुक्यात विखुरलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र एकूण ५२३२ चौ.कि.मी. असून १२१ कि.मी. सागरी किनारपट्टी आहे. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाचा एक लोकसभा व दोन विधानसभा मतदारसंघाशी संबंध येतो. विभागांतर्गत कार्यक्षेत्राशी दोन विधानपरिषदेचे सदस्य निगडीत आहेत. लोकसभा/ विधानसभा/ विधानपरिषद सदस्य यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाशी निगडीत असलेली मतदारसंघातील कामे प्राधान्याने आवश्यकतेनुसार व निधीशी अधीन राहून हाती घेण्यांत येतात.

सावंतवाडी , सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत एकूण ०५ उपविभाग असून राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्र यामध्ये विभागलेले आहेत. या विभागांतर्गत सावंतवाडी, कुडाळ, वेंगुर्ला , मालवण , दोडामार्ग असून एकूण ०५ उप अभियंते उपविभागीय कार्यालयाची जबाबदारी सांभाळतात. (विभाग/ उपविभाग कार्यालयाची सूची व मुख्यालये – परिशिष्ट ‘‘ब’’) विभागीय कार्यालयांतर्गत प्रमुख राज्यमार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग यांची दर्जेनिहाय लांबी व सदर रस्त्यांवर येणारे लहान व मोठे पूल यांची सूची परिशिष्ट ‘‘क’’ प्रमाणे सोबत जोडण्यांत येत आहे. विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत प्रामुख्याने प्र.रा.मा.८७.२७५ कि.मी. राज्यमार्ग २५९.७०५ कि.मी.व प्रमुख जिल्हा मार्ग २०८.३४२ कि.मी. अशी एकूण लांबी ५५५.३२२ कि.मी. येते. त्याचप्रमाणे विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत एकूण ९२३३९.४८ चौ.मी.इतके जोत्याचे क्षेत्रफळ असून त्यापैकी प्रशासकीय इमारतीचे ५०४६४.५९ चौ.मी. व ४१८७४.८९ चौ.मी. क्षेत्रफळ निवासी इमारतींचे आहे.

## ५. विभागीय कार्यालयांतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता

### अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक -

विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील ठेकेदारांची नोंदणी, विविध प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी त्यास सक्षम अधिकारी इत्यादींची माहिती तसेच रस्ते पुल व इमारती आणि इतर कामांविषयींची माहिती , कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट-ड) नमूद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे यांची माहिती विहित फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयांत मिळू शकेल.

नैसर्गिक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होवू शकेल.

### ब) माहितीची सुलभता -

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mhapwd.com या वेबसाईटवरुन (संकेतस्थळावरुन) वेळावेळी सादर केल्या जाणाऱ्या विभागीय माहितीचा तपशिल व आकडेवारीचा तपशिल जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

**✻ या विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांपैकी सर्वांत महत्वाच्या व जिव्हाळयाच्या योजना म्हणजे साकव बांधणी कायक्रम व सागरी महामार्ग -**

सिंधुदुर्ग हा जिल्हा डोंगराळ प्रदेशात मोडत असून पावसाळयात लहान मोठया नाल्यांना व ओढयांना पूर येत असल्याने ते ओलांडून जाणे अशक्य होते. परिणामी ग्रामस्थांची मोठी गैरसोय होत असे. ही अडचण किमान खर्चात दूर करण्यासाठी व हे काम लवकर होण्यासाठी सन १९८५ पासून साकव कार्यक्रमातूनही साकवांची कामे हाती घेण्यांत आलेली आहेत.

सुरुवातीला बहुतांशी साकव हे लोखंडी सांगाडयाचे बांधण्यांत आले. सन १९८१ पासून मोठया प्रमाणांत बांधण्यांत आलेले लोखंडी साकव कोकणातील खाऱ्या व दमट हवामानामुळे गजण्याचे व नादुरुस्त होण्याचे प्रमाण वाढले, किंबहुना काहीवेळा दुरुस्ती अभावी पडण्याचे प्रसंग उद्‌भवले. यास्तव सार्वजनिक बांधकाम मंडळाने भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन दिनांक ०६/०५/२००४ च्या परिपत्रकानुसार लोखंडी डेकींगचे साकव बांधण्यांत येवू नयेत व पुढील साकव आर.सी.सी.स्लॅबचे बांधण्यांत यावेत. अशा सूचना दिल्या.

आर.सी.सी. स्लॅबचे नमुना संकल्पन नसल्यामुळे सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी मार्फत १.५० मीटर व २.५० मीटर रुंदीच्या साकवांकरीता नमुना संकल्पन तयार करुन दिनांक ०५/११/२००४ रोजी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील साकव बांधण्याकरीता नमुना सकल्पन वितरीत केले आहे व त्यानुसार साकव बांधकाम करण्यांत येत आहे.

ही योजना सुरु झाल्यानंतर कोकणातील विशिष्ट भौगोलिक परिस्थिती नदया/खाडया व तेथील लहान गावे/वाडया वाढत्या वस्त्या यांना ३ कि.मी. अंतराची अट ठेवून साकव बांधणे अडचणीचे ठरु लागले, त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दिनांक ०४/१०/१९९० च्या शासन निर्णयान्वये सदरची अट १ कि.मी. अंतरापर्यंत शिथिल करण्यांत आली. सदर अट शिथिल झाल्यामुळे अनुज्ञेय साकवांच्या संखेत वाढ होत आहे.

तथापि बांधकाम साहित्य, मजुरी, यंत्रसामुग्री यामध्ये मोठया प्रमाणांत भाववाढ झाल्याने १५/०१/१९९६ च्या परिपत्रकानुसार प्रत्येक साकवाची वित्तीय मर्यादा रु. १०.०० लक्ष पर्यंत वाढविण्यांत आली होती तद्नंतर दिनांक ३०/१०/२००७ च्या परिपत्रकानुसार सदर वित्तीय मर्यादा प्रत्येक साकवासाठी रु. २०.०० लक्ष इतकी वाढविण्यांत आली आहे.

**सागरी महामार्ग -**

सागरी महामार्गाची सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी अंतर्गत येणारी आखणी कालावल, कोळंब, कुंभारमाठ, तारकर्ली, वेंगुर्ला, शिरोडा , किरणपाणी या गावातून आहे.

**सिंधुदुर्ग जिल्हयातील सागरी महामार्गाच्या लांबीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कामाचा वाव | लांबी (कि.मी.) |
|---|---|---|
| **१.** | एकूण लांबी | ८७.२७५ |
| **२.** | बांधकाम पूर्ण झालेली लांबी | ८७.२७५ |
| **३.** | नव्याने बांधावयाची लांबी | ००.०० |

**सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी अंतर्गत एकूण ०९ मोठे पूल सागरी महामार्गावर येत असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| **(१)** पूर्ण झालेले पूल | कालावल, कोळंब, केळूस , मोचेमाड, टांक (रेडी) , तारकर्ली, तेरेखोल (सातार्डा) | ०७ पूल |
| **(२)** अर्थसंकल्पात समाविष्ट प्रगतीपथावरील पूल | बांदीवडे पूल, ता.मालवण व किरणपाणी पूल, ता.वेंगुर्ला | ०२ पूल |
| | **एकूण** | **०९ पूल** |

## ६. विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता -

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी "अपघात निवारण समिती" स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

अपघात निवारण समितीने मंडळांतर्गत कार्यक्षेत्रातील रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करुन सुचविलेल्या अपघात प्रवण स्थळांची सुधारणा व उपाययोजना टप्प्याटप्प्याने हाती घेण्यांत येत आहे. यामध्ये विभागाच्या कार्यक्षेत्रात प्रामुख्याने १०२ अपघात प्रवण स्थळे समितीने सुचविलेली असून त्यापैकी प्राधान्यक्रमाने ९८ अपघात प्रवण स्थळांची सुधारणा विभागाने केलेली आहे. विभागाने रस्ते सुरक्षिततेवर भर देण्यांत येत असून तपशिलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यांवर लावण्यांत येत आहेत. जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचाऱ्यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

## ७. गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांची छाननी

### अ) गाऱ्हाणी/ तक्रारी यांचे निराकरण -

नागरीकांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण विहित कालावधीत करणे हे विभागाचे प्रमुख उद्दीष्ट राहील. कार्यपूर्तीस होणारा विलंब व अन्य काही गाऱ्हाणी विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील कार्यालयाबाबत अथवा विभागांतर्गत काही कामाबाबत असतील तर , त्यासाठी नागरीकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे/ तक्रार असेल तर ज्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ - उप विभागीय कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गाऱ्हाणे मांडावे व विभाग कार्यालयाविरुध्द गाऱ्हाणे / तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गाऱ्हाणे मांडावे. अशा गाऱ्हाणी/ तक्रारीचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ०७ दिवसांत करण्यांत येईल. गाऱ्हाणी/ तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र पेटी ठेवण्यांत येईल.

गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा ''इ'' मेल द्वारेही नागरीक मांडू शकतात.

**ब) नागरीकांच्या सनदेचा आढावा/ सिंहावलोकन**

सावंतवाडी (सा.बां.) विभागाच्या या नागरीकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा घेण्यांत येईल व त्याचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यांत येईल.

**क) जनसामान्यांकडून सुचना -**

सावंतवाडी (सा.बां) विभागाची ही नागरीकांची सनद सर्वसामान्य नागरीकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरीकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरीकांची सनद स्वतःहून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरीकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**८. नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी -**

सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, सावंतवाडी हे नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यांस कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देवून नागरीकांच्या प्रतिक्रीया / अभिप्राय मागविण्यांत येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यांत येतील.

सावंतवाडी (सा.बां.) विभाग, सावंतवाडी खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरीकांना संवेदनशील सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. ग्राहक केंद्रीत सेवेची उद्दीष्टे प्राधान्याने अंगीकारुन ग्राहकांना त्वरीत प्रतिसाद दिला जाईल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरीकांचा सल्ला घेतला जाईल.

प्रशिक्षित व प्रोत्साहित कर्मचारी वर्गाद्वारे नविन तंत्र वापरुन ग्राहकांना सेवा पुरविली जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यांत येईल तसेच नागरीकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यांत येईल व तक्रारशुन्य सेवा असल्याची खात्री करण्यांत येईल.

## ९ भांडार शाखा

विभागातील भांडाराचा संग्रह हा भांडारपाल यांच्या प्रभाराखाली ठेवण्यांत येतो. सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे तीन भागात कार्य करावे लागते.

**(अ)** भांडारे संपादन करणे

**(ब)** भांडारे ताब्यात ठेवणे व आवश्यकतेनुसार वितरण करणे

**(क)** विल्हेवाट लावणे

**(ड)** भांडाराची सुरक्षा व त्याचा हिशोब विविध नोंदवहयांत ठेवणे.

विभागाच्या अधिपत्याखाली उप विभागीय कार्यालये कार्यरत असतात. या कार्यालयानां सोपविलेल्या बांधकामासाठी सिमेंट , स्टील व पातळ व बंदिस्त डांबराची आवश्यकता असते. यासाठी उप विभागाकडून सर्वसाधारणपणे मागणी घ्यावी लागते.

प्राप्त मागणीनुसार संबंधित शासनमान्य पुरवठादारांकडून उदा. सिमेंटसाठी सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया , स्टीलसाठी स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया किंवा टाटा आयर्न स्टील कंपनी, पातळ व बंदीस्त डांबर खरेदीसाठी मे.हिन्दुस्थान पेट्रो, भारत पेट्रो व इंडीयन ऑईल कं. यांकडे पुरवठा आदेश पाठवावा लागतो.

प्राप्त झालेले भांडार - साहीत्य संबंधित उप विभागास पुरवठा करण्यांत येतो.

विभागाकरीता आवश्यक असणाऱ्या हत्यारे व संयंत्रे अशा साहित्याची मागणी उप विभागाकडून मागविण्यांत येते.

उप विभागाकडून साहित्याची मागणी यादी विभागास प्राप्त झाल्यानंतर ती एकत्रित करण्यांत येते.

प्राप्त मागणी एकत्रित करुन शासनमान्य पुरवठादार किंवा स्थानिकरित्या दरपत्रके मागवून दर कोटेशन नोटीस पाठवून दरपत्रके मागविण्यांत येतात व साहित्य पुरवठादाराने पुरवठा आदेश पाठविल्यापासून ९० दिवसांपर्यंत ग्राहय धरण्यांत येतात.

दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर विभागाद्वारे साहित्याचा पुरवठा आदेश मंजुरी प्राप्त करुन घेण्यांत येते.

प्राप्त साहित्य हे विभागातील भांडारात ठेवण्यांत येते व मागणीपत्रानुसार उप विभागात लवकरात लवकर देण्यांत येते. यासाठी सदरच्या साहित्याची नोंद ही सर्वप्रथम नमुना ३३ (हत्यारे व संयंत्रे जमा विवरणपत्रात) मध्ये घेण्यांत येते व विभागात नमुना ३७ (Ledger of T & P) मध्ये घेण्यांत येते.

विभागांतर्गत यांत्रिकी सा.बां.उप विभागास निरीक्षण वाहने व कन्स्ट्रक्शन व्हेईकल्स यांची उप विभागातील यांत्रिकी कार्यशाळेत दुरुस्ती केली जाते. यासाठी साहित्य खरेदी प्रक्रिया केली जाते.

उप विभागातील वाहनांचे जुने निरुपायोगी साहित्याचा लेखा हा नमुना ६६ (Dismentalled of Material) मध्ये उप विभागात ठेवण्यांत येतो. वाहनांच्या प्राप्त साहित्याची नोंद ही वाहनांच्या हीस्ट्रीशीट मध्ये अद्ययावत ठेवण्यांत येते व ज्या वेळेस वाहनांना इंधन साहित्याचा पुरवठा केला जातो. तेव्हा त्यांच्या नोंदी वाहनांच्या लॉगबुकात घेतल्या जातात.

विभागीय कार्यालयाकरीता आवश्यक असणाऱ्या स्टेशनरी साहित्याचे मागणीपत्र मा.व्यवस्थापक, येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय येरवडा पुणे यांचेकडे नमुना क्र, सर्वसा.१६१ म सर्वसाधारण व सा.बां. विभाग मालीकेमधील प्रमाणपत्रांसाठी वार्षिक मागणीपत्र दरवर्षी सप्टेंबर मध्ये सादर करण्यांत येते व कार्यालय लेखन सामुग्रीकरीता वार्षिक मागणीपत्र आणि सूचनापत्र (पावती) (विशेष लेखनसामुग्री-२) नमुन्यात दोन प्रतीत सादर करण्यांत येते.

तसेच जे साहित्य उपरोक्त कार्यालयाकडून प्राप्त होत नाही. त्या साहित्याची खरेदी स्थानिकरित्या दरपत्रके मागवून तद्वत निविदा निश्चिती करुन खरेदी करण्यांत येते. त्यांच्या नोंदी ‘‘स्टेशनरी साहित्य रजिस्टर’’ मध्ये घेण्यांत येतात.

**१०. परिशिष्टे**

**अ)** (१) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता

(२) कार्यभार दर्शविणारा तक्ता

**ब)** विभाग / उप विभाग कार्यालयाची सूची व मुख्यालय

**क)** कार्यक्षेत्रातील दर्जेनिहाय रस्ते लांबी व लहान / मोठे पूल यांची सुची

**ड)** कार्यपूर्तीचे वेळापत्रक

## परिशिष्ट अ

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>सावंतवाडी. | उप कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>सावंतवाडी. |
| उप विभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उप विभाग,<br>मालवण. | उप विभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र.१,<br>सावंतवाडी. |
| उप विभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उप विभाग,<br>दोडामार्ग. | उप विभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र.१,<br>कुडाळ. |
| उप विभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उप विभाग,<br>वेंगुर्ला. | |

# परिशिष्ट ब

## सावंतवाडी सा.बां.विभाग/ उप विभाग निहाय तक्ता

| अ.क्र. | विभागीय कार्यालय/ उप विभागीय कार्यालये |
|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी. |
| २. | सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र.१, सावंतवाडी. |
| ३. | सार्वजनिक बांधकाम उप विभाग क्र.१, कुडाळ. |
| ४. | सार्वजनिक बांधकाम उप विभाग , वेंगुर्ला |
| ५. | सार्वजनिक बांधकाम उप विभाग, मालवण. |
| ६. | सार्वजनिक बांधकाम उप विभाग, दोडामार्ग. |

## परिशिष्ट क

## प्रकार व पृष्ठभाग त्यानुसार रस्त्यांची लांबी (कि.मी.)

**मार्च २०११ अखेर** **सावंतवाडी (सा.बां.)विभाग, सावंतवाडी.**

| **बाब** | **रस्त्यांचा प्रकार** | | | |
|---|---|---|---|---|
| | **प्रमुख राज्यमार्ग** | **राज्यमार्ग** | **प्रमुख जिल्हा मार्ग** | **एकूण रस्त्यांची लांबी** |
| **(१)** सिमेंट कॉंक्रीट | - | - | - | - |
| **(२)** सा.बां.विभाग | | | | |
| खडीचे | - | - | - | - |
| **(३)** सा.बां.विभाग | | | | |
| डांबरी | ८७.२७५ | २५९.७०५ | २०८.३४२ | ५५५.३२२ |
| **(४)** सा.बां.विभाग | | | | |
| इतर माल वापरुन तयार केलेले | - | - | - | - |
| **अ)** सा.बां.विभाग | | | | |
| **एकूण लांबी** | **८७.२७५** | **२५९.७०५** | **२०८.३४२** | **५५५.३२२** |

## परिशिष्ट क

## विभागाच्या कार्यक्षेत्रातील लहान / मोठे पूल यांची सूची

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | मोठे पूल | लहान पूल | मोऱ्या |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १. | सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी. | २१ | ९३ | २१३१ |
| | **एकूण** | **२१** | **९३** | **२१३१** |

## परिशिष्ट ड

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी/ मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | कंत्राटदार वर्ग १ अ, १ ब, १ क, २ व ३ यांची नोंदणी व नुतनीकरण | सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे |
| २. | कंत्राटदार वर्ग ४ व ४ (अ) नोंदणी व नुतनीकरण | मुख्य अभियंता, क्षेत्रीय कार्यालय | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे |
| ३. | कंत्राटदार वर्ग ५ , ६ आणि बेरोजगार अभियंत्यांचे नोंदणीकरण व मजूर सहकारी संस्था वर्ग अ यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | अधीक्षक अभियंता | ३० दिवस |
| ४. | कंत्राटदार वर्ग ७,८,९ आणि मजूर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण, इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग ७ मध्ये नोंदणीकरण व नुतनीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ५. | विश्रामगृहाचे आरक्षणपत्र | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| ६. | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीचा नाहरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| ७. | पेट्रोल पंप आणि पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना हरकत प्रमाणपत्र | शासन | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे |
| ८. | रस्ता ओलांडून जाणाऱ्या वाहिन्यांसाठी ना हरकत प्रमाणपत्र | मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्गासाठी व अधीक्षक अभियंता इतर मार्गासाठी | १५ दिवस वरिष्ठ कार्यालयास सादर करणे |
| ९. | चलतचित्र गृहाचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १०. | सरकारी इमारतींचे ना उपलब्धता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| ११. | सरकारी निवासस्थान मिळण्याबाबतचे प्रतिक्षा यादी क्रमांक | कार्यकारी अभियंता | ७ दिवस |
| १२. | रास्त भाडे / प्रमाणभाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १३. | इमारतींच्या भाडयाचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |
| १४. | इमारतींचे मुल्य निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |

**टिप -** सर्व वर्गाच्या नोंदणी व नुतनीकरण करणेसाठी अर्ज कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयात स्विकारण्यांत येतात.

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
सावंतवाडी.